**पोलीस उप-आयुक्त,गुन्हे पिंपरी चिंचवड**
पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड,
प्रेमलोक पार्क, चिंचवड,पुणे -३३ दुरध्वनी क्र. ०२०-२७३५०१२०
ई मेल आयडी – dcphq.pcpc-mh@gov.in

**प्रेस नोट ता.०७/०२/२०२५**

## गुन्हे शाखा, युनिट १ ची उल्लेखनिय कामगिरी

# १६ वर्षा पासुन पोलीसांना गुंगारा देणा-या खुनाच्या गुन्हयातील आरोपीस गोवा राज्य येथुन केले जेरबंद

मा.पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे साहेब यांनी पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे हद्दीत सांगवी पोलीस ठाणे गु.रजि.नं. २६५/२००९ भारतीय दंड संहिता कलम ३०२ या गुन्हयातील आरोपी हा १६ वर्षा पासुन फरारी असुन त्याचा शोध घेवुन अटक करणेबाबत गुन्हे शाखा युनिट १ यांना आदेशीत केले हाते. गुन्हे शाखा युनिट -१ चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक सुहास आव्हाड त्यांचे अधिपत्याखालील पोलीस अधिकारी व अंमलदार असे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीतील सांगवी पोलीस ठाणे,गु.रजि.नं.२६५/२००९ भा.दं.वि कलम ३०२ या गुन्हयाची माहीती घेत गुन्ह्याचा समांतर तपास करीत असताना नमुद गुन्हयातील पाहिजे आरोपी नामे-सुनिल कांगणे हा गुन्हा केल्यापासुन त्याचे मुळगावी मु.हिब्बट,पोस्ट-मोटरगा,ता.मुखेड,जि.नांदेड येथे न राहता वेगवेगळया राज्यात जावुन आपले अस्तित्व लपवुन राहत असुन तो सद्या गोवा राज्य येथे राहण्यास आहे अशी खात्रीशिर गोपनिय बातमी अंमलदार १७९१ गर्जे यांना मिळाल्याने तात्काळ मा.वरिष्ठांचे परवानगीने गुन्हे शाखा,युनिट १ कडील पोलीस स्टाफ पो.हवा.९७७ जावळे,पो.हवा.९७७ बो-हाडे,पो.हवा.१४१७ महाडीक,पो.हवा.१५२४ मोरे यांना सदर आरोपीचा शोध घेवुन त्यांस ताब्यात घेणेकामी गोवा येथे पाठविण्यात आले. नमुद पोलीस स्टाफ यांनी मिळाले बातमीच्या आधारे सदर पाहिजे आरोपीचा गोवा येथे कसोशीने शोध घेवुन त्यांस ताब्यात घेतले. पाहिजे आरोपी नामे- सुनिल अशोकराव कांगणे,वय ३९ वर्षे,सद्या रा.ओल्ड हेरिटेज मंगल कार्यालय, आकसी मार्केट जवळ, सुलाभट, गोवा, मुळ रा.मु.हिब्बट,पोस्ट-मोटरगा,ता.मुखेड,जि.नांदेड यास ताब्यात घेवुन सदर गुन्हयाचे अनुषंगाने अधिक तपास करता त्यांने सुमारे १६ वर्षापुर्वी नमुद सिक्युरिट डयुटीचा पॉईट बदलल्याचे कारणा वरुन चिडुन जावुन धारधार शस्त्राने वार करुन सुभाष सोपान धाकतोंडे,वय ५५ वर्षे, रा. सिध्दार्थ नगर, राहटणी,पुणे याचा खुन केला आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे, सह पोलीस आयुक्त श्री शशिकांत महावरकर, अप्पर पोलीस आयुक्त श्री वसंत परदेशी, पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री संदिप डोईफोडे, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे श्री विशाल हिरे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट १ चे पोलीस निरीक्षक सुहास आव्हाड, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक शिवाजी कानडे, पोलीस अमंलदार सोमनाथ बो-हाडे,महादेव जावळे,गणेश महाडीक,सचिन मोरे, प्रमोद गर्जे यांनी केली आहे.

(संदिप डोईफोडे)
पोलीस उप आयुक्त गुन्हे
पिंपरी चिंचवड